University of Mumbai

# मुंबई विद्यापीठ
# ई-मासिक वार्तापत्र

ऑगस्ट २०२४

वर्ष - ०३ • अंक ०८



## नॅक द्वारा पुनर्मूल्यांकनामध्ये ३.६५ सीजीपीए सहित अ ++ श्रेणी
## विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा

# ५७ व्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटन



५७ व्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटनप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी



५७ व्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटनप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना प्रसिद्ध कवी आणि अभिनेते किशोर कदम

मुंबई, दि. ३१ ऑगस्ट: मुंबई विद्यापीठामार्फत आयोजित ५७ व्या आंतरमहाविद्यालयीन/ संस्थात्मक/ विभागीय सांस्कृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटन आज सुप्रसिद्ध कवी आणि अभिनेते किशोर कदम यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, सुप्रसिद्ध पार्श्वगायक शैल हाडा, नृत्य दिग्दर्शिका कृती महेश, अभिनेता गौरव मोरे, रांगोळीकार विलास रहाटे, वृत्त निवेदिका प्रज्ञा पोवळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील, सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक निलेश सावे यांच्यासह कला-नाट्य यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यापीठाच्या फोर्ट संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या उद्घाटन सोहळ्यात उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वेळेचे उत्तम नियोजन आणि अथक प्रयत्न करण्याचा मोलाचा सल्ला सुप्रसिद्ध कवी आणि अभिनेते किशोर कदम यांनी दिला. कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात असलेली आवड जोपासण्यासाठी महाविद्यालयीन जीवनातील वक्तृत्व स्पर्धेची आठवणही त्यांनी करून दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक युवा महोत्सवाचे खूप मोठे स्थान आहे. राज्यासह देशपातळीवर उत्कृष्ट कामगिरी करून सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मोठी कामगिरी केली आहे. युवा महोत्सव हे विद्यार्थ्यांच्या कला गुणांचे दर्शन घडविणारे, त्यांच्यातील उर्जा आणि सादरीकरणासाठीचे एक उत्तम व्यासपीठ आहे. अशा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्यातील कला-गुणांचा अविष्कार करण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कोणत्याही क्षेत्रात वावरताना सर्वोत्तमतेचा ध्यास घेऊन मार्गक्रमण करू त्या त्या क्षेत्रातील दिग्गजांचे अथक परिश्रम, जिद्द




**५७ व्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटनप्रसंगी प्रसिद्ध कवी आणि अभिनेते किशोर कदम यांचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी**

आणि चिकाटीचे अवलोकन करावे, विविध टप्प्यांवरील यशापयशाचे धडे घेऊन बोध घेण्याचा मौलिक सल्लाहाय त्यांनी यावेळी दिला. विद्यार्थी विकास विभागाने या स्पर्धांच्या प्राथमिक फेऱ्यांचे उत्तम आयोजन केल्याबद्दल त्यांनी सर्व संयोजक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या आयुष्यात आणि करिअरच्या जडणघडणीत मोठे योगदान लाभले असल्याचे उपस्थित माजी विद्यार्थी पार्श्वगायक शैल हाडा, नृत्य दिग्दर्शिका कृती महेश, अभिनेता गौरव मोरे, रांगोळीकार विलास रहाटे आणि वृत्त निवेदिका प्रज्ञा पोवळे यांनी सांगितले. दरवर्षी सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात कला- सांस्कृतिक क्षेत्रात अमूल्य ठसा उमटविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा विद्यापीठातर्फे सन्मान केला जातो.

मुंबई विद्यापीठामार्फत दरवर्षी सांस्कृतिक युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या सांस्कृतिक युवा महोत्सवाचे हे ५७ वे वर्ष आहे. या सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या प्राथमिक फेऱ्या मुंबई विद्यापीठाच्या सात जिल्ह्यातील विविध बारा परिक्षेत्रात आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये जवळपास ३५० हून अधिक महाविद्यालयांतील सुमारे १० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, वाङ्मय आणि ललित कला या एकूण पाच कला प्रकारातील विविध ४१ स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. प्राथमिक फेरीतील विजेत्यांचे अंतिम फेरीसाठी झालेल्या निवडीचे सादरीकरण हे ७ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सुरु राहणार आहे. यामधून जे विजेते होतील त्यांची निवड चाचणी करून संघ तयार करून पुढे तो संघ राज्यस्तरीय, पश्चिम क्षेत्र आणि देश पातळीवरील आंतरविद्यापीठीय सांस्कृतिक युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

# दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ
## १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत करता येणार ऑनलाईन अर्ज

मुंबई, दि.३० ऑगस्टः मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या (सीडीओई) पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे. विस्तारीत वेळापत्रकानुसार आता १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत या सर्व अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे.

दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने केले जात आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क; एम. कॉम. (ॲडव्हान्स अकाउंटन्सी), एम. कॉम. (बिझनेस मॅनेजमेंट) एम.एस्सी. (गणित) एम.एस्सी. (माहिती तंत्रज्ञान), एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज https://mucdoeadm.samarth.edu.in/ या संकेतस्थळावरून भरता येतील.

तसेच एमसीए आणि एमएमएस अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसही १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पदव्युत्तर प्रथम आणि द्वितीय वर्षासाठीचे एम.ए. (शिक्षणशास्त्र) चे प्रवेश आणि द्वितीय वर्ष एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क; एम. कॉम. (अकाऊंट/ मॅनेजमेंट), एम.एस्सी. (गणित) एम.एस्सी. (माहिती तंत्रज्ञान), एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज - https://idoloa.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरून भरता येतील.

पदवीच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष बीए. बीकॉम, बीकॉम (अकाऊंट अँड फायनान्स), बीएस्सी (माहिती तंत्रज्ञान), बीएस्सी (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज - https://idoloa.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरून भरता येतील. या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंबधातील सर्व तपशील विद्यापीठाच्या https://mu.ac.in/distance-open-learning/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सीडीओईचे चर्चगेट, ठाणे, कल्याण, रत्नागिरी व सावंतवाडी येथे विभागीय केंद्रे असून या ठिकाणी प्रवेशासंबंधी मार्गदर्शन व अध्ययन साहित्याचे वितरण केले जाते. नजीकच्या काळात पालघर येथेही लवकरच विभागीय केंद्र सुरु होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही किंवा ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे अशा विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण प्रणाली हा एक योग्य पर्याय असून यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन सीडीओईचे संचालक प्रा. शिवाजी सरगर यांनी केले आहे.

# डॉ. प्रसाद कारंडे यांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा कार्यभार स्विकारला



मुंबई विद्यापीठाचे नवनियुक्त कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे

मुंबई, दि. २६ ऑगस्टः वीरमाता जीजाबाई तंत्रज्ञान संस्था मुंबई येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रसाद कारंडे यांनी आज मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा कार्यभार स्विकारला. व्यवस्थापन परिषदेच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मावळते प्रभारी कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांनी डॉ. प्रसाद कारंडे यांना कुलसचिव पदाचा कार्यभार सोपवला. दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. प्रसाद कारंडे यांची निवड समितीद्वारे मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड करण्यात आली होती.

डॉ. प्रसाद कारंडे हे वीरमाता जीजाबाई तंत्रज्ञान संस्था मुंबई येथे पूर्णवेळ सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी बीई (मॅकेनिकल) आणि एमई (प्रोडक्शन) शाखेत पदव्युत्तर पदवी आणि अभियांत्रिकी शाखेत पीएचडीचे शिक्षण घेतले आहे. डॉ. प्रसाद कारंडे यांना एकूण २८ वर्षांचा शैक्षणिक आणि प्रशासकीय अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक पदाचा यशस्वीरित्या प्रभारी कार्यभार सांभाळला आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी आणि प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे यांनी डॉ. प्रसाद कारंडे यांचे अभिनंदन करून पुढील भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रशासकीय कामकाजात गतिमानता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्वासाठी डिजिटायझेशन वर भर देऊन, सर्वांच्या सहकार्याने काम करण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचे डॉ. प्रसाद कारंडे यांनी पदभार स्वीकारतेवेळी सांगितले.

# आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी मुंबई विद्यापीठाचा पुढाकार

## आरोग्य सेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी पर्ड्यू विद्यापीठाशी शैक्षणिक सामंजस्य

## सेमी कंडक्टर क्षेत्रातील अद्ययावत संशोधनासाठीही सहकार्य



पर्ड्यू विद्यापीठाचे व्हाईस प्रेसिडेंट ऑफ ग्लोबल पार्टनरशिप्स अँड प्रोग्राम्स आणि डायरेक्टर ऑफ सेमी कंडक्टर एज्युकेशनचे प्रा. विजय रघुनाथन आणि कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी

मुंबई, दि. २६ ऑगस्टः मुंबईसह, महाराष्ट्र आणि देशातील आरोग्यसेवेच्या बळकटीकरणासाठी मुंबई विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या मदतीने आरोग्य सेवेतील महत्वपूर्ण संशोधन विद्यापीठात होणार आहे. मुंबई विद्यापीठातील 'एआय इन हेल्थ केअर सेंटर'च्या माध्यमातून आरोग्य सेवेतील विदा संकलन, विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्यासाठी अमेरिकेतील प्रतिष्ठित पर्ड्यू विद्यापीठाशी शैक्षणिक सामंजस्य करण्यासाठी विद्यापीठाने स्वारस्य दाखवले आहे. लवकरच दोन्ही विद्यापीठात शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात येणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या 'एआय इन हेल्थ केअर सेंटर'च्या माध्यमातून मुंबईतील अनेक रुग्णालयातील महत्वपूर्ण विदा संकलित केली जात असून त्याचे योग्य विश्लेषण करून व निष्कर्ष काढून संभाव्य धोके टाळण्यासाठी आणि भविष्यकालीन उपाययोजना करण्यासाठी या केंद्राच्या माध्यमातून काम केले जाणार आहे. नुकतेच मुंबई विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या वतीने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलगुरू यांनी अमेरिकेतील पर्ड्यू येथे पर्ड्यू विद्यापीठातील व्हाईस प्रेसिडेंट ऑफ ग्लोबल पार्टनरशिप्स अँड प्रोग्राम्स आणि डायरेक्टर ऑफ सेमी कंडक्टर एज्युकेशनचे प्रा. विजय रघुनाथन यांची भेट घेऊन कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सहाय्याने आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी विविध विषयांवर चर्चा केली. पर्ड्यू विद्यापीठाकडे असलेल्या अद्ययावत तंत्रज्ञानच्या सुविधा आणि प्रगत संसाधनाच्या माध्यमातून भारतातील रुग्णालयातील संकलित विदा व त्याचे विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्यासाठी पर्ड्यू विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापक मुंबई विद्यापीठास सहकार्य करणार आहेत. नजीकच्या काळात या क्षेत्रातील सहपदवीच्या शिक्षणासाठीही पाऊले उचलली जाणार असल्याचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

याचबरोबर भारताच्या सेमी कंडक्टर मिशनला सहकार्य करण्यासाठीही विद्यापीठातील नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नोलॉजी विभागामार्फत हाती घेण्यात आलेल्या सेमी कंडक्टर क्षेत्रातल्या संशोधनाला चालना मिळण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा आणि उपकरणांच्या माध्यमातून सेमी कंडक्टर क्षेत्रातील प्रगत संशोधनासाठी दोन्ही विद्यापीठात शैक्षणिक सामंजस्य केले जाणार आहे. तसेच मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांना फॅकल्टी

प्रोग्रामच्या अनुषंगाने प्रशिक्षणही उपलब्ध करून दिले जाणार आहे. या अनुषंगानेही कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी पर्डयू विद्यापीठातील डायरेक्टर ऑफ सेमी कंडक्टर एज्युकेशनचे प्रा. विजय रघुनाथन यांच्याशी चर्चा केली. नजीकच्या काळात माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र आणि नॅनो सायन्स अँड नॅनो टेक्नोलॉजी या क्षेत्रात सह पदवीचे शिक्षण आणि प्रगत संशोधनाच्या क्षेत्रातही शैक्षणिक सहकार्य यावरही सकारात्मक चर्चा करण्यात आली असल्याचेही कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या बनावट संकेस्थळापासून सावधान सायबर पोलिसात तक्रार दाखल

मुंबई, दि. २५ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे बनावट संकेतस्थळ आढळून आल्याने अशा बनावट संकेतस्थळापासून सर्व विद्यार्थी आणि भागधारकांनी सावधान राहण्याचे आवाहन मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रवेशासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी https://mu.ac.in/distance-open-learning हेच अधिकृत संकेतस्थळ असून फक्त याच संकेतस्थळाचा वापर करावा असेही आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. विद्यापीठाने याबाबतची गंभीर दखल घेत बीकेसी सायबर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु असून प्रवेश प्रक्रियेस ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी https://mucdoeadm.samarth.edu.in/ फक्त या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. तर पदवीच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षासाठी https://idoloa.digitaluniversity.ac/ फक्त या अधिकृत संकेतस्थळावरूनच ऑनलाईन अर्ज करावे असे आवाहन मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. तसेच विविध समाजमाध्यमात मुंबई विद्यापीठ आणि दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या नावे बनावट अकाऊंट्स तयार करण्यात आले असून अशा बनावट अकाऊंट्सपासूनही सावधान राहण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि मुंबई विद्यापीठ यांचे अधिकृत समाजमाध्यमांचे अकाऊंट असून फक्त अशाच अधिकृत अकाऊंट्सवरून प्रसिद्ध केलेली माहिती खरी समजण्यात यावी असेही विद्यापीठाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# कस्टम्स आणि लॉजिस्टिक्समधील उदयोन्मुख ट्रेंड आणि आव्हानांवर चर्चासत्राचे आयोजन

## मुंबई विद्यापीठाच्या गरवारे व्यवसाय शिक्षण आणि विकास संस्थेत 'कॅटलिस्ट VI' चे आयोजन




गरवारे व्यवसाय शिक्षण आणि विकास संस्थेत 'कॅटलिस्ट VI' कार्यशाळेला उपस्थित विविध मार्दर्शक

मुंबई, २५ ऑगस्टः जागतिक व्यापार आणि लॉजिस्टिक्सच्या क्षेत्रात झपाट्याने होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या गरवारे व्यवसाय शिक्षण आणि विकास संस्थेत 'कॅटलिस्ट VI' चे आयोजन करण्यात आले होते. कस्टम्स आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील उदयोन्मुख ट्रेंड आणि आव्हाने यावर उद्योग क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांनी प्रकाश टाकला. 'कॅटलिस्ट VI' या चर्चासत्रांतर्गत आंतरराष्ट्रीय व्यापार, सीमाशुल्क आणि लॉजिस्टिक्समधील वर्तमान बदल आणि भविष्यातील ट्रेंडबद्दल मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञांनी जागतिक व्यापारातील विकसित होत चाललेले ट्रेंड समजून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या अभ्यासपूर्ण चर्चेतून पीजीडीएलएसएम, पीजीडीसीसीएफएस आणि बीएमएससीसीएफएफएलच्या सहभागींना मोठा फायदा झाला. चर्चासत्रात विविध व्यावसायिक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी संस्थेचे संचालक प्रा. केयुरकुमार नायक, कार्यक्रम समन्वयक प्रकाश खत्री, सीमाशुल्क विभागाचे अतिरिक्त आयुक्त बालमुकुंद, लिंक्डइनवरील प्रख्यात मार्केटिंग स्ट्रॅटेजिस्ट विवेक कपूर, जागतिक व्यापार आणि लॉजिस्टिक तज्ज्ञ विजय व्होरा आणि सुप्रसिद्ध व्यवस्थापन सल्लागार विकास खत्री हे उपस्थित होते.

चर्चासत्रात उपस्थितांना मार्गदर्शन करताना सीमाशुल्क विभागाचे अतिरिक्त आयुक्त बालमुकुंद यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करणाऱ्या नियामक फ्रेमवर्कचे आणि जागतिक व्यापारावरील त्यांचे परिणाम यांचे सखोल विश्लेषण केले. लिंक्डइनवरील प्रख्यात मार्केटिंग स्ट्रॅटेजिस्ट विवेक कपूर यांनी लॉजिस्टिक क्षेत्रातील डिजिटल परिवर्तन आणि बाजारातील ट्रेंडवर त्याचा प्रभाव यावर चर्चा केली. जागतिक व्यापार आणि लॉजिस्टिक तज्ज्ञ विजय व्होरा यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार गतिशीलता आणि जागतिक लॉजिस्टिक्सच्या आव्हानांबद्दल त्यांचे ज्ञान सामायिक केले. तर सुप्रसिद्ध व्यवस्थापन सल्लागार विकास खत्री यांनी लॉजिस्टिक्स आणि सीमाशुल्क क्षेत्रातील विविध अडथळयांवर मात करण्यासाठी विविध धोरणात्मक उपाययोजनाबाबत मार्गदर्शन केले.

कस्टम्स आणि लॉजिस्टिक्स मधील उदयोन्मुख ट्रेंड आणि आव्हानांवरील चर्चासत्राच्या आयोजनामुळे सहभागींना या क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींसोबत नेटवर्किंग करण्याची मोठी संधी उपलब्ध होऊ शकेल असा आशावाद कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

## मुंबई विद्यापीठातर्फे ई-समर्थ कार्यप्रणालीबाबत महाविद्यालयांना प्रशिक्षण

### सातही जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांसाठी २० ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत कार्यशाळांचे आयोजन


ई-समर्थ कार्यप्रणाली प्रशिक्षण कार्यशाळेला उपस्थित विविध महाविद्यालयांचे प्रतिनिधी



ई-समर्थ कार्यप्रणाली प्रशिक्षण कार्यशाळेला मार्गदर्शन करताना मुंबई विद्यापीठाचे अधिकारी

मुंबई, दि. २२ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी शासनाच्या ई-समर्थ प्रणालीचा अवलंब केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात आलेल्या या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांचे प्रवेश, नाव नोंदणी, पात्रता व प्रमाणपत्रांची कार्यवाही करण्यात येते. महाविद्यालयांमार्फत ई-समर्थ पोर्टलवर करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सातही जिल्ह्यात २० ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. यातील पहिल्या टप्प्यातील कार्यशाळेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे २० ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेला महाविद्यालयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये ३५ महाविद्यालये सहभागी झाली होती. तर दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाअंतर्गत २१ ऑगस्ट रोजी रत्नागिरी येथील खेड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेसाठी २० महाविद्यालये सहभागी झाली होती. तर २२ ऑगस्ट रोजी रत्नागिरी उप परिसरात आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत २४ महाविद्यालये सहभागी झाली होती.

सदर कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक आणि महाविद्यालयीन प्रतिनिधींना प्रवेश, नाव नोंदणी, पात्रता, आणि स्थलांतर प्रमाणपत्र बाबतची आज्ञावली, विद्यार्थ्यांचे जाहीर करावयाचे निकाल, संलग्नता विभागाच्या अनुषंगाने पोर्टलवर

भरावयाची माहिती आणि त्याबाबतचे प्रात्यक्षिक याची माहिती देण्यात आली. विद्यापीठाच्या वतीने डीआयसीटी संचालक डॉ. प्रवीण सिनकर, डॉ. हिरेन दंड, संलग्नता विभागाचे उपकुलसचिव दिपक वसावे, प्रवेश, नावनोंदणी, पात्रता आणि स्थलांतर विभागाचे उपकुलसचिव अशोक घुले आणि परीक्षा विभागाच्या वतीने उपकुलसचिव नरेंद्र खलाने यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेतील पुढील टप्प्याअंतर्गत २४ ऑगस्टला सिंधुदुर्ग, २८ ऑगस्टला पालघर, २९ ऑगस्टला ठाणे, ३० ऑगस्टला नवी मुंबई व पनवेल आणि ३१ ऑगस्टला मुंबई विद्यापीठात कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत करता येणार ऑनलाईन अर्ज

मुंबई, दि.२२ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या (सीडीओई) पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे. विस्तारीत वेळापत्रकानुसार आता ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत या अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे.

दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने केले जात आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क; एम. कॉम. (एडव्हान्स अकाउंट्सी), एम. कॉम. (बिझनेस मॅनेजमेंट) एम.एस. सी. (गणित) एम. एस. सी. (माहिती तंत्रज्ञान), एम. एस. सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज https://mucdoeadm.samarth.edu.in/ या संकेतस्थळावरून भरता येतील.

तर पदव्युत्तर प्रथम आणि द्वितीय वर्षासाठीचे एम.ए. (शिक्षणशास्त्र) चे प्रवेश आणि द्वितीय वर्ष एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क; एम. कॉम. (अकाउंट्स/ मॅनेजमेंट), एम.एस. सी. (गणित) एम. एस. सी. (माहिती तंत्रज्ञान), एम. एस. सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज - https://idoloa.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरून भरता येतील.

पदवीच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष बीए. बीकॉम, बीकॉम (अकाऊंट अँड फायनान्स), बीएस्सी (माहिती तंत्रज्ञान), बीएस्सी (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज - https://idoloa.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरून भरता येतील. या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेसंबधातील सर्व तपशील विद्यापीठाच्या https://mu.ac.in/distance-open-learning/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सीडीओईचे चर्चगेट, ठाणे, कल्याण, रत्नागिरी व सावंतवाडी येथे विभागीय केंद्रे असून या ठिकाणी प्रवेशासंबंधी मार्गदर्शन व अध्ययन साहित्याचे वितरण केले जाते. नजीकच्या काळात पालघर येथेही लवकरच

विभागीय केंद्र सुरु होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही किंवा ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे अशा विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण प्रणाली हा एक योग्य पर्याय असून यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन सीडीओईचे संचालक प्रा. शिवाजी सरगर यांनी केले आहे.

---

## डेटा ॲनालिटिक्स आणि सायबर सिक्युरिटी नंतर आता केमिस्ट्रीमध्ये सह पदवी मुंबई विद्यापीठ आणि सेंट लुईस विद्यापीठाची एकत्रित पदवी



मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी आणि सेंट लुईस विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. फ्रेड पेस्टेलो यांच्यासह विविध मान्यवर

मुंबई, दि. २० ऑगस्ट: मुंबई विद्यापीठ आणि अमेरिकेतील प्रसिद्ध सेंट लुईस विद्यापीठ यांच्यात झालेल्या करारानुसार मुंबई विद्यापीठात प्रत्यक्षात सह पदवीच्या शिक्षणाला सुरुवात झाली आहे. एमएस डेटा ॲनालिटिक्स आणि एमएस सायबर सिक्युरिटी या दोन अभ्यासक्रमांच्या सह पदवीला विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता केमिस्ट्रीमध्ये सह पदवीसाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. नुकतेच मुंबई विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या वतीने कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सेंट लुईस विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. फ्रेड पेस्टेलो यांची सेंट लुईस मिसोरी स्टेट यूएसए येथे भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा करून पदव्युत्तर स्तरावरील केमिस्ट्री मध्ये सह पदवीच्या शिक्षणासाठी स्वारस्य दाखवले आहे. याबाबत लवकरच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून दोन्ही विद्यापीठामार्फत एमएससी केमिस्ट्री या सह पदवीसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण मुंबई विद्यापीठात तर द्वितीय वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण सेंट लुईस विद्यापीठात मिळणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना कार्यांतर्गत प्रशिक्षण आणि इंटर्नशिपही करता येणार आहे. विशेष म्हणजे सह पदवी कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या या सह पदवीमुळे प्रत्येक संस्थेच्या सामर्थ्याचा आणि कौशल्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टता वृध्दीस हातभार लागणार आहे. एमएससी केमिस्ट्री या अभ्यासक्रमासाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय वातावरणात केमिस्ट्रीमधील विविध विषयातील अध्ययनाच्या शाखा, संशोधन पद्धती, अद्ययावत प्रयोगशाळा आणि उपकरणांचा अभ्यास करता येईल. त्याचबरोबर या सहयोगाअंतर्गत दोन्ही विद्यापीठातील पायाभूत व अनुषंगिक सुविधा, कौशल्य आणि आधुनिक उपकरणे

आणि संसाधनाच्या एकत्रित वापरामुळे अध्ययन व संशोधनातील संभाव्य परिणाम साध्य करता येऊ शकणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच पुढे जाऊन या कराराची व्याप्ती वाढवून मानव्यविज्ञान विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयात सह पदवीच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. या करारामुळे उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने वाटचाल करताना रसायनशास्त्र शाखेतील उद्योन्मुख क्षेत्रात भारत आणि अमेरिकेतील संशोधनाच्या प्राधान्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील जागतिक समज विस्तृत करण्यास मदत होईल तसेच विद्यार्थ्यांसाठी संधीचे नवे दालनही खुले होणार असल्याचेही प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांना सहाय्य:**

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साहचर्य व विद्यार्थी सहाय्य केंद्राच्या वतीने सेंट लुईस विद्यापीठात द्वितीय वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हिजा सुलभीकरण, तज्ज्ञांकडून समुपदेशन, कागदपत्रांचे साक्षांकीकरण, शिष्यवृत्ती सहाय्य, वसतिगृह सहाय्य अश्या अनुषंगिक बाबींसाठी सहाय केले जाणार आहे.

**सह पदवीचे फायदे:**

* विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळवण्याची संधी
* मुंबई विद्यापीठ आणि सेंट लुईस विद्यापीठाकडून मिळणाऱ्या सह पदवीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीची आंतरराष्ट्रीय ओळख वाढविण्यास मदत
* विद्यार्थ्यांना भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांतील वैविध्यपूर्ण शैक्षणिक वातावरण, अध्यापन पद्धती आणि संशोधन पद्धतींचा फायदा
* दोन वेगवेगळ्या देशांमध्ये राहणे आणि अभ्यास करण्यामुळे विद्यार्थ्यांना सांस्कृतिक जागरूकता, अनुकूलता आणि भाषा कौशल्ये विकसित करण्यास मदत
* सांस्कृतिक आणि भाषा कौशल्ये वृद्धीस मदत
* दोन्ही संस्थांमधील अत्याधुनिक संशोधन सुविधा आणि प्रयोगशाळांच्या प्रवेशामुळे व्यावहारिक कौशल्ये आणि संशोधन क्षमता वाढीस चालना

# परदेशी विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठास पसंती
## जपान, पॅलेस्टाईन, फिजी, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, मॉरिशस, लिसोथासह अनेक देशातील विद्यार्थ्यांनी घेतले प्रवेश

मुंबई, दि. १७ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांस परदेशी विद्यार्थ्यांनी पहिली पसंती दर्शवली आहे. मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इंग्रजी, वाणिज्य, समाजशास्त्र, कम्पुटर सायन्स, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, भौतिकशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता आणि भाषाशास्त्र अशा विषयांना या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये जपान, पॅलेस्टाईन, फिजी, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, मॉरिशस, युगांडा, लिसोथासह १४ देशातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यातील सर्व विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर पदवी अभ्यासक्रमांसाठीही परदेशी विद्यार्थ्यांनी पसंती दर्शवली आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम., बीएस्सी (कम्पुटर सायन्स), बी.ए.एमएमसी अशा विविध अभ्यासक्रमांसाठी हे विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या (आयसीसीआर) माध्यमातून पहिल्यांदाच सर्वाधिक परदेशी विद्यार्थ्यांचे प्रवेश मुंबई विद्यापीठात झाले आहेत. आयसीसीआरच्या विविध योजनाअंतर्गत पूर्णपणे अनुदानित शिष्यवृत्तीवर हे विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.

आयसीसीआरच्या व्यतिरिक्त अनिवासी भारतीय, भारतीय वंशाची व्यक्ती आणि भारताचे परदेशी नागरिकत्व या वर्गवारीतूनही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यातील बहुतांश ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयात पदवीच्या पारंपारिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांना पसंती दर्शवली आहे.

मुंबई विद्यापीठाने मागील वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करत विविध पदव्युत्तर आणि पदवीच्या अभ्यासक्रमांची पूनर्रचना केली आहे. बहुविद्याशाखीय,लवचिकता, कार्यांतर्गत प्रशिक्षण, सह पदवी, दुहेरी पदवी, संशोधन, कौशल्यवृद्धी,भारतीय ज्ञान प्रणाली, क्षमता संवर्धन आणि वैकल्पिक विषय असे विद्यार्थी केंद्रीत मोठे बदल करून विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्याचबरोबर उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने पाऊल टाकत वैश्विक ज्ञानार्जनाच्या कक्षा रुंदावल्या असल्यामुळे परदेशी विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठास पसंती मिळणे हे समाधानकारक असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह राहायला उपलब्ध झाल्यामुळे नजीकच्या काळात परदेशी विद्यार्थ्यांची संख्या निश्चितच वाढेल असेही त्यांनी सांगितले.

# मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभागाचे पुरस्कार प्रदान

## भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहण कार्यक्रमाची क्षणचित्रे



राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभागाचे पुरस्काराने सन्मानित झालेले विविध मान्यवर

मुंबई, दि. १५ ऑगस्ट: मुंबई विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यात राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभागाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कार वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंताचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र- कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे यांच्या हस्ते सर्व पुरस्कार विजेत्यांना सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारात उत्कृष्ट स्वयंसेवक शहरी भागातून मयुर शेवाळे, दिपशिखा सिंह आणि ग्रामीण भागातून रोहन तांबडे व भक्ती पिसे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून शहरी भागातून कथीरेसन आणि ग्रामीण भागातून नितीन देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. विद्यापीठ स्तरावरील उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कक्ष म्हणून शहरी भागातून रामानंद आर्य डी.ए.व्ही. महाविद्यालय आणि ग्रामीण भागातून दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय यांचा

सन्मान करण्यात आला. क्षेत्रीय समन्वयक म्हणून शहरी भागातून मोहम्मद गानी आणि ग्रामीण भागातून युवराज पाटील यांना सन्मानित करण्यात आले. जिल्हा समन्वयक म्हणून निखिल कारखानीस यांचा गौरव करण्यात आला. तर प्रजासत्ताक दिन संचालन शिबिर २०२४ यामध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व केल्याबद्दल संपदा मावळणकर यांना सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थी विकास विभागाच्या पुरस्कारात ५६व्या सांस्कृतिक आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद पटकाविल्याबद्दल आर. ए. पोदार महाविद्यालय आणि द्वितीय पारितोषिकासाठी मिठीबाई महाविद्यालयास गौरविण्यात आले. १८ व्या आंतरमहाविद्यालयीन अविष्कार संशोधन स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदासाठी बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी आणि द्वितीय पुरस्कारासाठी रामनारायण रुईया महाविद्यालय, निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्स आणि विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी यांचा सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून उपस्थितांना मार्गदर्शन करताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू म्हणाले, मुंबई विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. परदेशातील अनेक नामांकित उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. दुहेरी पदवी आणि सह पदवीच्या शिक्षणाला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. त्याचबरोबर उद्योन्मुख क्षेत्रातील गरजा व संधी लक्षात घेऊन अनेक संशोधनाचे क्षेत्र निवडून त्यावर काम करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सेंटर फॉर एआय इन हेल्थ केअर सेंटरच्या स्थापनेसाठी आणि सेमी कंडक्टर मिशनसाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. तसेच भारतातील प्राचीन आणि समृद्ध भाषांचे जतन, संवर्धन आणि वृध्दीसाठीही योजना तयार केल्या असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ.अजय भामरे यांनी विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न अपेक्षित असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले. मुंबई विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी विविध प्राधिकरणाचे मान्यवर सदस्य, शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्थेची ‘मित्र’च्या ज्ञान भागीदारीसाठी निवड

## राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या सूचीसाठी करणार मूल्यमापन



महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ ट्रान्सफॉरमेशन सोबत सामंजस्य करारासाठी उपस्थित मान्यवर

मुंबई, दि. १३ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाच्या १०० वर्षाहून अधिक जुन्या आणि प्रतिष्ठित अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था (आधीचे अर्थशास्त्र विभाग) या विभागाची महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ ट्रान्सफॉरमेशनच्या (MITRA) ज्ञान संस्था अर्थात ज्ञान भागीदारीसाठी निवड करण्यात आली आहे. विविध धोरणात्मक आणि विकासात्मक क्षेत्रात राज्य समर्थन अभियान - महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) ला पाठबळ देण्यासाठीची ज्ञान संस्था म्हणून मदत घेण्याचे निश्चित करण्यात आले. नीती आयोगाच्या धर्तीवर नॉलेज पार्टनर म्हणून मुंबई विद्यापीठाची ही प्रतिष्ठित संस्था काम पाहणार आहे. याअनुषंगाने नुकताच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी मुंबई विद्यीपीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्थेच्या संचालिका प्रा. मनिषा करणे आणि प्रकल्प समन्वयक प्रा. एस. के. कोठे उपस्थित होते.

या करारांतर्गत अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था ही बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज (BSE) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज (NSE) वर सेबीने (SEBI) ठरवलेल्या निकषांवर आधारित महाराष्ट्र सरकारच्या मालकीच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे सूचीसाठी मूल्यमापन करणार आहे. जिल्हा विकास आराखडा तयार करणे व त्याला गुणात्मक सहाय्य देणे यासाठी मुंबई विद्यापीठाच्या ‘मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी’ हा विभाग काम पाहत आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या निर्देशानुसार या संस्थेने मुंबई उपनगर, रत्नागिरी आणि ठाणे जिल्ह्याचे जिल्हा विकास आराखडे बनवण्याचे काम यशस्वीपणे केले आहे.

# मुंबई विद्यापीठात मिळेल आता दुहेरी आणि सह पदवीचे शिक्षण

## उद्योन्मुख क्षेत्रातील अध्ययन आणि संशोधनासाठी मुंबई विद्यापीठाचा पुढाकार

## अमेरिकेतील इंडियाना विद्यापीठासोबत शैक्षणिक सामंजस्य



**इंडियाना विद्यापीठाच्या चांसलर आणि एक्झीक्युटीव्ह व्हाईस प्रेसिडेंट प्रा. लथा रामचंद यांचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी**

मुंबई, दि. १० ऑगस्टः डिजीटल फॉरेन्सिक, केमिकल बायोलॉजी, नॅनोबायोसिस्टम, सस्टेनेबल अग्रीकल्चर, हेल्थ इन्फॉर्मेटिक्स अँड डेटा सायन्स, मटेरिअल फिजिक्स आणि कम्प्युटेशनल मॅथेमॅटिक्स या उद्योन्मुख क्षेत्रातील प्रगत अध्ययन आणि संशोधनाच्या संधीचे दालन आता मुंबई विद्यापीठात खुले होणार आहे. मुंबई विद्यापीठाने अमेरिकेतील प्रतिष्ठित इंडियाना विद्यापीठासोबत शैक्षणिक सामंजस्यासाठी पुढाकार घेतला आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्यासह शिष्टमंडळांनी इंडियाना विद्यापीठातील चांसलर आणि एक्झीक्युटीव्ह व्हाईस प्रेसिडेंट प्रा. लथा रामचंद यांच्यासह इतर मान्यवरांशी शैक्षणिक सामंजस्यासाठी स्वारस्य दाखविले आहे. प्रा. लथा रामचंद या मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थी असून प्रतिष्ठित इंडियाना विद्यापीठाचे नेतृत्व करीत आहेत.

दोन्ही विद्यापीठात झालेल्या शैक्षणिक सामंजस्याच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने अग्रक्रमाने पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील दुहेरी आणि सह पदवीच्या शिक्षणासाठी व उद्योन्मुख क्षेत्रातील संधी आणि गरजा लक्षात घेऊन प्रगत संशोधनासाठी स्वारस्य दाखविले आहे. दुहेरी आणि सह पदवीच्या शिक्षणाला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या आणि चौथ्या सत्राचे शिक्षण इंडियाना विद्यापीठात घेता येईल, त्याचबरोबर तेथील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठात तिसऱ्या आणि चौथ्या सत्राचे शिक्षण घेता येईल. दुहेरी पदवी कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळणार असून आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या या दुहेरी पदवीमुळे प्रत्येक संस्थेच्या सामर्थ्याचा आणि कौशल्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टता वृध्दीस हातभार लागणार असल्याचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

स्टडी अब्रॉड प्रोग्राम अंतर्गत विद्यार्थी विनिमयामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय वातावरणात उद्योन्मुख क्षेत्रातील विविध संशोधन पद्धती आणि प्रगत उपकरणांचा अभ्यास करता येईल. दोन्ही विद्यापीठातील संशोधकांना संयुक्त आणि सहयोगी प्रकल्पांवर एकत्रित काम करता येईल. त्याचबरोबर संशोधन सहयोगाअंतर्गत दोन्ही विद्यापीठातील पायाभूत व अनुषंगिक सुविधा, कौशल्य आणि आधुनिक उपकरणे आणि संसाधनाच्या एकत्रित वापरामुळे संशोधनातील संभाव्य परिणाम साध्य करता येऊ शकतील. या सहयोगी कार्यक्रमामुळे संशोधन प्रकाशने आणि संयुक्त प्रकाशनावरही काम करण्याची संधी मिळू शकणार असल्याचेही मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र

कुलकर्णी यांनी सांगितले. ग्लोबल एज्युकेशन सिटीजनशिप आणि उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दृष्टिकोनातून मुंबई विद्यापीठ आणि इंडियाना विद्यापीठ यांच्यातील शैक्षणिक सामंजस्याचे महत्व अधोरेखित होणार आहे. या भेटीदरम्यान मुंबई विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या वतीने इंडियाना विद्यापीठातील प्रगत व अत्याधुनिक प्रयोगशाळाना भेटी देऊन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधनाच्या विविध संधीवंरही चर्चा करण्यात आली.

दोन्ही विद्यापीठातील शैक्षणिक सामंजस्याच्यावतीने झालेल्या चर्चेत मुंबई विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साहचर्य व विद्यार्थी सहाय्य केंद्राचे समन्वयक डॉ. सुनील पाटील आणि इंडियाना विद्यापीठाच्या वतीने चांसलर आणि एक्झीक्युटीव्ह व्हाईस प्रेसिडेंट प्रा. लथा रामचंद, अधिष्ठाता प्रा. जॉन, सहयोगी अधिष्ठाता प्रा. राजीव राजे, इंटिग्रेटेड नॅनोसिस्टमस् डेव्हलपमेंट इन्स्टीट्यूटचे संचालक प्रा. मंगीलाल अगरवाल, संचालक प्रा. डेव्हिड आणि संचालक प्रा. स्टीव्ह उपस्थित होते.

## नवप्रतिभावंताच्या उद्यमशीलतेला पाठबळ मिळण्यासाठी आवाहन

## गर्जे मराठी 'ग्लोबल समिट फॉर एक्सलन्स' मध्ये मुंबई विद्यापीठ सहभागी




न्यूजर्सी येथे आयोजित गर्जे मराठी 'ग्लोबल समिट फॉर एक्सलन्स' मध्ये उपस्थितांशी संवाद साधताना कुलगुरु प्रा. रवींद्र कुलकर्णी

मुंबई, दि. ०८ ऑगस्टः अमेरिकेतल्या न्यूजर्सी येथे नुकत्याच पार पडलेल्या गर्जे मराठी 'ग्लोबल समिट फॉर एक्सलन्स' मध्ये सहभागी झालेले उद्योजक, व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ, टेक्नॉक्रॅट यांनी पुढे येऊन मुंबई विद्यापीठातील नवप्रतिभावंताच्या उद्यमशीलतेला पाठबळ देण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मुंबई विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी केले. तसेच विद्यापीठातील विविध विभागामार्फत हाती घेण्यात आलेले संशोधन प्रकल्प आणि स्टार्टअपना सहकार्य मिळावे असेही आवाहन यावेळी करण्यात आले. विशेष म्हणजे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी केलेल्या आवाहनाला अनेक उपस्तिथांनी सकारात्मक साद देत, विद्यापीठातील स्टार्टअप आणि संशोधनाला सहकार्य आणि चालना देण्यासाठी मेंटॉर, प्रोफेसर ऑफ प्रैक्टिस आणि विद्यार्थी आणि शिक्षकांच्या फायद्यासाठी उदयोन्मुख क्षेत्रातील गरजा आणि संधी लक्षात घेऊन

महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन आणि व्याखानासाठी अनुकूलता दर्शवली आहे.

०३ आणि ०४ ऑगस्ट २०२४ ला अमेरिकातल्या न्यूजर्सी येथे आयोजित केलेल्या गर्जे मराठी 'ग्लोबल समिट फॉर एक्सलन्स' मध्ये मुंबई विद्यापीठास आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या वतीने सहभागी झालेल्या शिष्टमंडळात कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्यासह संशोधन सल्लागार प्रा. फारूक काझी आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील सहभागी झाले होते.

या संमेलनात कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी 'ट्रांसफोर्मेशनल रोडमॅप इन द लॅंडस्केप ऑफ हायर एज्युकेशन ऑफ महाराष्ट्र थ्रू एनइपीए-२०२०' या विषयावर सादरीकरण केले. महाराष्ट्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे आमुलाग्र बदल पाहायला मिळत असून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय शिकण्याची मुभा, लवचिकता, बहुविद्याशाखीय शिक्षण, कार्यांतर्गत प्रशिक्षण, दुहेरी आणि सहपदावीचे शिक्षण मिळत आहे. मुंबई विद्यापीठामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी केली जात असून विद्यापीठामार्फत त्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

### २२ ऑगस्ट २०२४ पर्यंत करता येणार ऑनलाईन अर्ज

मुंबई, दि. ०८ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या (सीडीओई) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे. दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये होणारे पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राचे प्रवेश हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने होणार आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क; एम. कॉम.(अकाउंट्स), एम. कॉम. (व्यवस्थापन) एम.एस. सी. (गणित) एम. एस. सी. (माहिती तंत्रज्ञान), एम. एस. सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज https://mucdoeadm.samarth.edu.in या संकेतस्थळावरून भरता येतील. पदव्युत्तर प्रथम वर्षाच्या या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया २२ ऑगस्ट २०२४ पर्यंत सुरु राहणार आहे.

पदव्युत्तर प्रथम वर्षासाठीचे एम.ए. (शिक्षणशास्त्र) चे प्रवेश आणि द्वितीय वर्ष एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क; एम. कॉम.(अकाउंट्स), एम. कॉम. (व्यवस्थापन) एम.एस. सी. (गणित) एम. एस. सी. (माहिती तंत्रज्ञान), एम. एस. सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया ९ ते २२ ऑगस्ट २०२४ पर्यंत राबवली जाणार आहे. त्याचबरोबर पीजीडीएफएम या अभ्यासक्रमाचे प्रवेश ही याच कालावधीत केले जाणार आहेत. या सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज - https://idoloa.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरून भरता येतील.

पदवीच्या द्वितीय वर्ष बीए. बीकॉम, बीकॉम (अकाऊंट अँड फायनान्स), बीएस्सी (माहिती तंत्रज्ञान),

बीएस्सी (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही सुद्धा ९ ते २२ ऑगस्ट या कालावधीत राबवली जाणार आहे. या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंबधातील सर्व तपशील विद्यापीठाच्या https://mu.ac.in/distance-open-learning या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.


सीडीओईचे चर्चगेट, ठाणे, कल्याण, रत्नागिरी व सावंतवाडी येथे विभागीय केंद्रे असून या ठिकाणी प्रवेशासंबंधी मार्गदर्शन व अध्ययन साहित्याचे वितरण होणार आहे. पालघर येथेही लवकरच विभागीय केंद्र सुरु होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही किंवा ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे अशा विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण प्रणाली हा एक योग्य पर्याय असून यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन सीडीओईचे संचालक प्रा. शिवाजी सरगर यांनी केले आहे.

## प्रतिकात्मक वास्तवातून बौध्द कलेचे दर्शन "चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन"

## मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागाचा पुढाकार



सम्मुतिसच्च चित्र प्रदर्शनाची क्षणचित्रे



सम्मुतिसच्च चित्र प्रदर्शनाची क्षणचित्रे

मुंबई, दि. ०२ ऑगस्टः मुंबई विद्यापीठाचे पाली विभाग, 'पाली भाषा आणि बौध्द कला' या अभ्यासक्रमाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने "सम्मुतिसच्च" या मथळ्याखाली "प्रतिकात्मक वास्तवातून बौध्द कलेचे दर्शन" या संकल्पनेवर आधारीत चित्रप्रदर्शन भरविण्यात आले आहे. या चित्रप्रदर्शनात पाली विभागातील "पाली भाषा आणि बौध्द कला" या एक वर्षीय पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी बौध्द प्रतिकवादाद्वारे अभिव्यक्त होणारी बौध्द कला आणि संस्कृती, यासह अनेक विषयांवर आपापल्या चित्रांद्वारे प्रदर्शन भरविले आहे. ख्यातनाम अभ्यासक विलास शिंदे यांच्यासह दक्षिण कोरिया येथील जिनसुक शिंदे, पाली विभागाच्या प्रमुख डॉ. योजना भगत, प्रा. विनोद भेले, सुनिल कांबळे आणि लक्ष्मण सोनावणे यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

बौध्द प्रतिकवादाद्वारे बौध्द कला संपूर्ण जगभरात मोठ्याप्रमाणात अभ्यासली जात असून या क्षेत्रात विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. यासाठी मुंबई विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून "पाली भाषा आणि बौध्द कला" या विषयावर एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुद्धा सुरू करण्यात आला असल्याचे विभाग प्रमुख डॉ. योजना भगत यांनी सांगितले.



सम्मुतिसच्च चित्र प्रदर्शनाची क्षणचित्रे

विभागाच्या वतीने भरविण्यात आलेले "सम्मुतिसच्च" हे चित्रप्रदर्शन नेहरू सेंटर येथील सर्क्युलर आर्ट गॅलरी, डॉ. ऍनी बेझंट रोड, वरळी मुंबई येथे आयोजित केलेले असून ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सर्वांसाठी निशुल्क खुले आहे.

या बौध्द प्रतिकवादावरील चित्रप्रदर्शनात- १. संदीप भगत - अरुपावचर लोक, २. प्रज्ञा गाणार - अनुसासन पाटिहारिय, ३. सीमा गोंडाणे - चतुसंवेजनियसिद्धी, ४. सुभाष शेगोकार - असोकस्स धम्मसासन, ५. गोरख घोलप – पटिसंधि, ६. ज्ञानज्योती बोदडे - निंबाळकर – विमुत्तिसुख, ७. अंजली क्षीरसागर - सन्दिट्ठिको, आदींचे प्रतिकात्मक बौद्ध चित्रकलेचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

## विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## ५६ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाचे पारितोषिक वितरण संपन्न




५६ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाचे
पारितोषिक वितरण समारंभाचे क्षणचित्रे

मुंबई, दि. ०१ ऑगस्ट: मुंबई विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात आलेल्या ५६ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवामध्ये यश संपादन केलेल्या विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय आणि राष्ट्रीय स्तरावर पार पडलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजेतेपद प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच ५६ व्या युवा सांस्कृतिक युवा महोत्सावामध्ये ज्या महाविद्यालयांनी सर्वसाधारण विजेतेपद मिळवले त्यांचाही सत्कार करून आयोजन समितीतील सदस्यांनाही सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते या सर्व विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

यामध्ये सर्वसाधारण विजेतेपद पोदार महाविद्यालय, दुसरे पारितोषिक मिठीबाई महाविद्यालय आणि तृतीय पारितोषिक जोशी बेडेकर महाविद्यालयांना प्रदान करण्यात आले. तर ११ झोनमधील सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केलेल्या ११ महाविद्यालयांनाही पुरस्काराने सन्मानित

करण्यात आले. तसेच अंतिम फेरीसाठी सहभागी झालेल्या महाविद्यालयामधून संगीत, नाटक, ललितकला, वा0ङ्मय आणि नृत्य या पाचही विभागामध्ये सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त महाविद्यालयांचाही सन्मान करण्यात आला. तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी विश्वनाश मांलडकर यास जॅकपॉट स्पर्धेतील विजेता म्हणून मिस्टर युनिव्हर्सिटी तर पोदार महाविद्यालयातील कुमारी रिया मोरे या विद्यार्थीनीस जॅकपॉट स्पर्धेतील विजेती मिस युनिव्हर्सिटी म्हणून सन्मानित करण्यात आले. अमेय करूलकर यास गोल्डन बॉय आणि आशना जैन या विद्यार्थीनीस गोल्डन गर्ल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांनी सर्व पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येत असून युवा महोत्सव सारख्या स्तूत्य उपक्रमातून अनेक प्रतिभावंताना त्यांच्यातील सुप्त कला गुणांचा अविष्कार करण्याची मोठी संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तर युवा सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून विद्यापीठाने अनेक तरुण कलावंत घडविले असून ही प्रक्रिया निरंतर सुरु असल्याचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील यांनी सांस्कृतिक युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने केलेल्या नेत्रदीपक कामगिरीवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. नीतिन आरेकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सांस्कृतिक समन्वय निलेश सावे यांनी सर्वांचे आभार मानले.

निर्मिती आणि संपादन:
**जनसंपर्क विभाग**
मुंबई विद्यापीठ

पत्ता:
**मुंबई विद्यापीठ**
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००३२

प्रकाशक:
**प्रा. बळीराम गायकवाड**
कुलसचिव

info@mu.ac.in www.mu.ac.in @Uni_Mumbai